# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## वित्त व लेखा विभाग

**आय.एस.ओ.९००१-२००८ युनिट**

## परिपत्रक

विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांसाठी सामुहिक वैद्यकीय विमा योजना आणि सामुहिक वैयक्तिक अपघात योजना व त्यांच्या नातेवाईकांसाठी सामुहिक वैद्यकीय विमा योजना दि. ११ नोव्हेंबर, २००४ पासून राबविण्यात येत आहे. सदर पॉलिसी ही Floater Policy या प्रकारची आहे. सेवक व सेवकांचे नातेवाईक मिळून विम्याची सध्याची कमाल मर्यादा रुपये ३ लाख दि. ११/११/२०१५ पासून करण्यात आलेली आहे.

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यात येते की, दि. ११/११/२०१७ ते १०/११/२०१८ या कालावधीतील विमा पॉलिसी दि ओरिएण्टल इन्शुरन्स कंपनीला देण्यात आलेली असून पॉलिसीच्या क्लेमबाबतचे कामकाज एमडीईंडिया हेल्थकेअर सर्व्हिसेस (टीपीए) प्रा. लि. पुणे करणार आहेत.

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सेवकांचा विमा हप्ता म्हणून १००% रक्कम व सेवकांच्या नातेवाईकांची विमा हप्त्याची ५०% रक्कम विद्यापीठ निधीतून अदा करण्यात आली व ५०% रक्कम सेवकाच्या माहे डिसेंबर, २०१७ ते फेब्रुवारी, २०१८ च्या वेतनातून कपात करण्यात येत आहे. ती खालीलप्रमाणे

| विद्यापीठ निधीतून अदा केलेली रक्कम | | | सेवकाच्या वेतनातून नातेवाईकाची वसूल करावयाची ५०% रक्कम | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| सेवक रु. | नातेवाईक रु. | एकूण रक्कम रु. | माहे डिसेंबर २०१७ वेतनातून कपात होणारी रक्कम रु. | माहे जानेवारी २०१८ वेतनातून कपात होणारी रक्कम रु. | माहे फेब्रुवारी २०१८ वेतनातून कपात होणारी रक्कम रु. | एकूण कपात होणारी रक्कम रु. |
| १२२७२/- | २६५८.५४ एक नातेवाईक | १४९३०.५४ | ४४३/- | ४४३/- | ४४३/- | १३२९/- |
| १२२७२/- | ५३१७.०८ दोन नातेवाईक | १७५८९.०८ | ८८६/- | ८८६/- | ८८६/- | २६५८/- |
| १२२७२/- | ७९७५.६२ तीन नातेवाईक | २०२४७.६२ | १३२९/- | १३२९/- | १३२९/- | ३९८७/- |

२..

विद्यापीठाच्या संकेतस्थळावर Circulars-Mediclaim Policy 2017-18 अंतर्गत वैद्यकीय विमा योजनेबाबत माहिती देण्यात आलेली आहे.

**सन २०१५-१६ साठी असलेली विमा कंपनी आणि टीपीए हयांचे समवेत नूतनीकरण झाल्यामुळे २०१५-१६ यावर्षी देण्यात आलेली वैद्यकिय ओळखपत्र हीच लागू असणार आहेत नव्याने ओळखपत्र देण्यात येणार नाहीत तसेच नव्याने सन २०१७-१८ साठी समाविष्ट झालेल्या सेवक व नातेवाईक यांनाच फक्त नविन ओळखपत्र वाटप करण्यात येतील.**

तरी सदर परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे सेवकांच्या नातेवाईकांचा विमा हप्ता कपात करण्यात येणार आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

सीए (डॉ.) विद्या गारगोटे,
वित्त व लेखा अधिकारी
अतिरिक्त कार्यभार

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
जा.क्र. वित्त/२०१७-१८/१६८१
दिनांक : २३ डिसेंबर, २०१७

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

१. मा. विभागप्रमुख )
सर्व शैक्षणिक विभाग, )
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ )
२. मा. शाखाप्रमुख )
सर्व प्रशासकीय शाखा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

यांना विनंती करण्यात येते की, आपल्या विभागामधील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांच्या निदर्शनास प्राधान्याने सदरचे परिपत्रक आणावे.